# महापारेषण

## महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित


प्रेषक :- कार्यकारी अभियंता
कार्यालयाचे नांव :- अउदा संवसु विभाग नांदेड
कार्यालयाचा पत्ता :- १३२ के.व्ही.उपकेंद्र जंगमवाडी परिसर, महापारेषण कंपनी मर्यादित, नांदेड-४३१६०५
संपर्क :- ०२४६२ - २६१८१७ (का / फॅक्स) ०२४६२ - २६१८१६ (वै)
सि आय एन क्र. :- U40109MH2005SGC153646
ई-मेल :- ee2240@mahatransco.in eenanded@gmail.com


जा.क्र.काअ/अउदावि/नांदेड/मासं/[illegible] - 126[illegible] दिनांक :- [illegible]2 FEB 2026

## जाहीर नोटीस

महापारेषण कार्यकारी अभियंता,अउदा संवसु विभाग,१३२ के.व्ही.उपकेंद्र, जंगमवाडी परीसर ,नांदेड अंतर्गत शिकाऊ उमेदवारी कायदा १९६१ नुसार शिकाऊ उमेदवार म्हणून सन २०२६-२०२७ करीता विजतंत्री (Electrician) या ट्रेंडमध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

२. सदर शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी शासनाच्या www.apprenticeshipindia.org or http://apprenticeshipindia.gov.inapprenticeship/opprutunity, https://www.apprenticeshipindia.gov.in/ या संकेतस्थळावर (**कार्यकारी अभियंता,अउदा संवसु विभाग,१३२ के.व्ही.उपकेंद्र, जंगमवाडी परीसर ,नांदेड** ) च्या खालील आस्थापना रजिस्ट्रेशन क्रमांकावर ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा कालावधी **दिनांक.०४.०२.२०२६ च्या ००.०० पासुन ते दि.११.०२.२०२६ च्या रात्री २३:५९ पर्यंत राहील.** त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा शिकाऊ भरती प्रक्रियेसाठी विचार केला जानार नाही याची नोंद घ्यावी. विजतंत्री (Electrician) शिकाऊ उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा अधिनियमानुसार १ वर्षाचा राहिल. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक माहिती खालील अस्थापनेच्या नावे नोंदनी क्रमाकांवर करणेत यावी.

| आस्थापनेचा रजिस्ट्रेशन क्रमांक | ट्रेड | एकुण |
|---|---|---|
| Establishment Name :- E.E.EHV O&M Dn.MSETCL Nanded<br>Location : E05202700372 | विजतंत्री<br>(Electrician) | एकुण जागा -(२८ ) |

१. शैक्षणिक अर्हता :- महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे व राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCTVT) नवी दिल्ली मान्यताप्राप्त औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री या व्यवसाय परीक्षेण उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२. विद्यावेतन शासनाच्या नियमाप्रमाणे लागु राहील.

३. पदसंख्या कमी किंवा जास्त करण्याचा व भरती प्रक्रियेशी निगडीत असलेले सर्व निर्णय घेण्याचा अधिकार व्यवस्थापनेकडे राखीव असतील व सदरचे निर्णय उमेदवारास कळविणे व्यवस्थापनास बंधनकारक राहणार नाही. भरती प्रक्रियेचे ठिकाण अउदा संवसु मंडळ, परळी वै.

४. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी आरक्षण शासनाच्या विविध नियमांनुसार लागु राहील.

५. ऑनलाईन अर्ज सादर करताना एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्रिका यामध्ये नमुद केलेले नाव व आधारकार्डवर नमुद केलेल्या नावाशी सुसंगत आहे किंवा कसे याची पडताळणी करुन माहीती भरावी.

६. एस.एस.सी. गुणपत्र / प्रमाणपत्र व आयटीआय उत्तीर्ण गुणपत्र / प्रमाणपत्र (दोन/चारही सेमिस्टरची) साक्षांकित प्रत व शाळा सोडल्याचा दाखला ऑनलाईन अर्जामध्ये अपलोड करणे आवश्यक आहे.

७. शिकाऊ उमेदवाराची सही, पालकाची सही, जातीचा प्रवर्ग, जन्मतारीख, एस.एस.सी मार्क, आयटीआय मार्क ही माहिती अचुक भरण्यात यावी. सदर महिती उपलब्ध न झाल्यास उमेदवारांच्या शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.

८. या भरती प्रक्रियमध्ये जे उमेदवार त्यांचा अर्ज परिपूर्णपणे वेबसाईटवर भरतील अशाच उमेदवारांचा तात्पुर्ती (Provisional) गुणवत्तेसाठी विचार केला जाणार असून, त्यामधील कागदपत्रे पडताळणीकरीता गुणवत्तेतील फक्त १०० (८४) उमेदवांराना अंतिम निवडीसाठी उपरोक्त कार्यालयीन पत्त्यावर ठिक सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणेबाबत, विजकीय संदेशाव्दारे सुचित करण्यात येईल. त्याचबरोबर ज्या उमेदवारांनी आस्थापना कोडवर नाव नोंदनी केलेली आहे परंतू अंतिम निवडीसाठी बोलविलेले नाही त्यांची गुणवत्ता यादी त्यांच्या मेलवर उमेदवारांच्या माहिती करीता पाठविण्यात येईल, जेणे करुन उमेदवारांकडून अधिकची चौकशी अथवा पत्र व्यवहार करावा लागणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

९. सदर प्रक्रियेमध्ये विभागाच्या कार्यक्षेत्रातील उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.

१०. शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रिये दरम्यान शिकाऊ उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-यांकडून दबाव आणल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रदद करणेत येईल याची नोंद घ्यावी.

११. शिकाऊ उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर फोटो, मुळ प्रमाणपत्रांची सुस्पष्ट स्कॅन करुन योग्य रितीने ऑनलाईन (Online) अर्ज सादर करावा. फोटो अथवा मुळ प्रमाणपत्र सुस्पष्ट नसेल तर अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१२. प्रशिक्षण घेऊ ईच्छिणा-या विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कालावधीत कोणताही तंत्रनिकेतन किंवा अभियांत्रिकी महाविद्यालयात पदविका/पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला नसावा. वरील कागदपत्रे अपलोड न केल्यास नोंदणीधारकांना पुढील प्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ई-मेलव्दारे कळविण्यात येईल. तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवू नये. तसेच जाहीरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहीरात रदद करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवत आहे. सदर बाबतीत कुठल्याही प्रकारचा अधिकचा पत्रव्यवहार व याअनुषंगाने कोणतिही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. या भरतीमध्ये राजकिय दबाव आणल्यास सदर उमेदवारास भरती प्रक्रियेतून रदद बादल करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

१३. वयोमर्यादा १८ ते ३० वय वर्षे (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्षे शिथिलक्षम)

१४. ऑनलाईन (Online) अर्ज सादर करताना उमेदवाराने सदयस्थितीत कार्यान्वित असणारा Email-ID व भ्रमनध्वनी क्रमांक कार्यान्वित नसल्यामुळे संपर्क करणे शक्य झाले नाही तर त्याची पूर्ण जबाबदारी उमेदवारांवर राहील.

१५. दि. ११.०२.२०२६ नंतर ऑनलाईन नोंदणी केलेल्या उमेदवारांचा शिकाऊ उमेदवारी भरती प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१६. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारांना ऑनलाईन अर्जासोबत जाती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाने मागणी केल्यास शासकीय नियमाप्रमाणे आरक्षणा संबंधित कागदपत्रे सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१७. शिकाऊ उमेदवारीचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण केल्यामुळे कंपनीमध्ये नोकरी मिळवण्याचा कोणताही अधिकार प्राप्त होत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

१८. निवड झालेल्या उमेदवारांनी जिल्हा शल्यचिकित्सालय यांच्याकडून वैद्यकिय दाखला देणे बंधनकारक आहे. तसेच निवड झालेल्या प्रत्येक उमेदवाराने (पोलिस पाटील, मुख्याध्यापक, नगरसेवक, सरपंच यांच्या स्वाक्षरीचे) चारित्र प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१९. कागदपत्रे तपासणी किंवा शिकाऊ उमेदवार म्हणुन हजर होण्याकरीता कोणत्याही रक्कमेची पुर्तता कंपनी देनार नाही.

२०. प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही निवासव्यवस्था कंपनीकडुन मागणी करता येणार नाही.

(आफताब आलम खान)
कार्यकारी अभियंता
अउदा संवसु विभाग नांदेड